REGISTERED No. B. 3434

डोंगरे यांच्या बालामृतानें

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख ५ नोव्हेंबर १९४७ अंक ४५

श्री — श्री — श्री — श्री — श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

**युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण**
**वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.**

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टके
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री — श्री — श्री — श्री — श्री

## "अर्था" चा पुढील अंक

दिवाळी निमित्त "अर्था" चे दोन अंक दरसालप्रमाणें बंद राहून, त्यानंतरचा अंक ३ डिसेंबर, १९४७ रोजीं प्रसिद्ध होईल.

# विविध माहिती

**दारिद्र्य आणि फुफ्फुसाचे विकार**—डॉ कीर्तीलाल हे अमेरिकेहून हृदय-विकारांचा अभ्यास करण्यास मदत करणारीं उपकरणें घेऊन हिंदुस्थानला परत येत आहेत. हिंदुस्थानांतील लोकांच्या दारिद्र्यामुळें हा रोग म्हणजे हिंदुस्थानांत एक मोठा प्रश्नच होऊन राहिला आहे, असें त्यांचें मत आहे.

**पाकिस्तानांत दंगा विम्याची सोय?**—सध्या चालू असलेल्या जातीय दंग्यांमुळें पिकांची व मालमत्तेची फार हानि होत आहे. ही हानि भरून काढण्यासाठी पाकिस्तान सरकार सक्तीच्या विम्याची योजना अंमलांत आणण्याचा विचार करीत आहे.

**कॉमिंटर्नचा नवा अवतार**—बेलग्रेड येथें स्थापन झालेल्या कम्युनिस्ट माहिती खात्याची पहिली बैठक बेलग्रेडला नोव्हेंबर संपण्यापूर्वी भरणार आहे. ह्या माहिती खात्यांत ९ कम्युनिस्ट पक्ष आहेत.

**हैद्राबाद संस्थानांत निवृत्त सैनिकांची सोय**—निजाम सरकारनें ५ लाख रुपये खर्चून सेवानिवृत्त सैनिकांना नोकऱ्या व स्थिरस्थावर होण्यासाठी सवलती देण्याची एक योजना आखली आहे. दुसरी १८ लाख रुपयांची योजना सेवानिवृत्त सैनिकांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय करण्यासाठी तयार केली आहे.

**वार्ता चित्रपट पुन्हां निघणार**—हिंदी संघराज्यानें हिंदी वार्तापट तयार करण्याचें पुन्हां ठरविलें आहे. ह्या वार्तापटांत इंडिअन न्यूज परेड ह्या छोट्या चित्रपटांचाही समावेश होणार आहे. युद्धकालांत उभारण्यांत आलेली ही संघटना एप्रिल १९४६ सालीं रद्द करण्यांत आली होती. नव्यानें सुरू केलेल्या संघटनेचें कार्य चालू झालें असून वार्तापट व छोटे चित्रपट दास-विण्यास लवकरच प्रारंभहि होईल.

**रे म्युझिअमला देणगी**—लॉर्ड रे महाराष्ट्र इंडस्ट्रिअल म्युझिअमच्या उद्योगविषयक ग्रंथालयाला मुंबई सरकारनें मदतीदाखल १,५०० रुपये मंजूर केले आहेत.

### हिंदुस्थान सरकारचें नवें कर्ज

व्याजाचा दर : २¾%. करमाफ नाहीं.
परतफेड : १९६२
रक्कम : ४० कोटि रु.
किंमत : १०० स १००.
अर्जाचा दिवस : फक्त १५ नोव्हेंबर, १९४७.

### मजूर पक्षाच्या लोकप्रियतेस ओहोटी

ब्रिटिश म्युनिसिपल निवडणुकांचे निकाल नुकतेच प्रसिद्ध झाले, त्यांवरून मजूर पक्षानें एकूण ६४३ जागा घालविल्या आहेत आणि हुजूर पक्षानें ६९७ जागा नव्यानें काबीज केल्या आहेत, असें दिसून येतें. कित्येक महत्त्वाच्या शहरांच्या म्युनिसिपालिट्यांतील मजूर पक्षाचें बहुमत नष्ट झालें आहे. हुजूरपक्षास ही घटना आनंददायक वाटत आहे.

### सटिक माल खरेदीचा कायदा, १९३०

(लेः- श्री. राम केशव रानडे, एलएल. एम, डि. अँड सेशन्स जज्ज, सांगली. प्रकाशकः—श्री. केशव खंडेराव पागे, सेंट्रल लॉ हाऊस, टिळक रोड, नागपूर शहर. पृ. सं. ११६. किंमत २ रु.)

मालाची खरेदी व विक्री हा सर्वसाधारण मनुष्याच्या दैनंदिन जिवनांतील एक महत्त्वाचा भाग आहे. तेव्हां याबाबतें "कायदा" काय आहे हें सर्वांस माहित असणें अत्यंत आवश्यक आहे अज्ञानजन्य गाफिलपणानें केलेल्या साध्या दिसणाऱ्या व्यवहारांतून अशा कांहीं घटना निर्माण होतात कीं त्यायोगें अडाणी माणसाचें भरून न येण्यासारखें नुकसान होतें.

इंग्रजी भाषेमध्यें माल खरेदीच्या कायद्यावर पुष्कळ पुस्तकें आहेत. परंतु लोकसंख्येचे मानानें फारच थोड्या लोकांस इंग्रजीचें ज्ञान असतें. शिवाय, कायद्यातील पारिभाषिक शब्दांमुळें, क्लिष्ट आणि संदिग्ध रचनेमुळें व इंग्रजी आपली मातृभाषा नसल्यामुळें, इंग्रजी जाणणाऱ्या लोकांसहि इंग्रजींत लिहिलेल्या पुस्तकांचे वाचनानें विषयाचें संपूर्ण आकलन होणें बरेंच अवघड जातें. या दृष्टीनें विचार केल्यास लेखकानें मराठीमध्यें सटिक माल खरेदीचा कायदा लिहून मराठी मातृभाषा असलेल्या जनतेस उपकृत केलेलें आहे.

या पुस्तकाचे लेखक, श्री. राम केशव रानडे, एलएल. एम., हे स्वतः कायदेपंडित, न्यायमूर्ति व कायद्याचे विद्यार्थीहि आहेत. त्यांनीं मराठी भाषेत बरींच पुस्तकें लिहिलेलीं आहेत व तीं लोकप्रियहि झालेलीं आहेत. विषय क्लिष्ट व दुर्बोध असूनहि लेखकानें तो सुबोध केलेला आहे. या कायद्यांत इतर कायद्यांप्रमाणें कलमांचा अर्थ स्पष्ट करण्याकरता जशीं उदाहरणें देत असतात तशीं दिलेलीं नाहींत, पण लेखकानें ठिकठिकाणीं स्वतः तयार केलेलीं उदाहरणें घालून विषयांत गोडी उत्पन्न करून तो सुगम केलेला आहे.

मराठी जाणणाऱ्या प्रत्येक इसमानें, मग तो व्यापारी असो अगर नसो, या पुस्तकाचा अवश्य अभ्यास करावा. त्यापासून त्याचा फायदाच होईल.

के. वि. दीक्षित
लॉ कॉलेज, पुणें — बी. ए., एलएल. बी.

### हिंदी स्वातंत्र्यानिमित्त पोस्टाची खास तिकिटें

हिंदी स्वातंत्र्याच्या सन्मानार्थ हिंदुस्थान सरकारनें पोस्टाचीं खास तिकिटें काढण्याचें योजिलें आहे. त्यांपैकी दीड आण्याचें तिकीट हिंदुस्थानांत प्रसृत होईल, साडेतीन आणेवालीं तिकिटें परदेशी जावयाच्या पाकिटांवर लागतील आणि बारा आणेवालीं तिकिटें एअरमेलसाठी आहेत. त्यांचें वर्णन खालीलप्रमाणें आहे:--

| तिकिटें | त्यावरील चित्र व मजकूर |
|---|---|
| १½ आ. | अशोक चक्र, जयहिंद, १५ ऑगस्ट १९४७. |
| ३½ आ. | राष्ट्रीय ध्वज, जयहिंद. |
| १२ आ. | विमान, जयहिंद |

### इंग्रज अधिकाऱ्यांच्या लाडक्या कुत्र्यांचा विमान प्रवास

गेल्या बुधवारीं ४२ कुत्रे विमानमार्गें इंग्लंडकडे जाण्यास निघाले. त्यांपैकी एक कुत्रा पुढें न्यूयॉर्कला जाणार आहे. प्रत्येक कुत्र्यासाठी एक स्वतंत्र पिंजरा असून त्यांची काळजी घेण्यासाठी एक रक्षक मुद्दाम त्यांचेबरोबर जात आहे. हे सर्व कुत्रे सेवानिवृत्त ब्रिटिश अधिकाऱ्यांचे असून त्यांचेबरोबर तेहि हिंदुस्थान सोडून जात आहेत.

# अर्थ

बुधवार, ता. ५ नोव्हेंबर, १९४७



प्रो. वा. गो. काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे.

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.

## कंझूमर्स सोसायट्यांच्या कार्यक्षेत्रांतील अडचणी

सहकाराचें तत्त्व जीवनाच्या विविध अंगोपांगांना लावतां येण्यासारखें असतांना, तें केवळ कर्ज देण्याघेण्याला लावल्यानें सहकारी संस्था म्हणजे कर्ज देण्याच्या संस्था, अशी एकांगी व्याख्या व्यवहारांत इतकीं वर्षें प्रसृत झाली होती. मद्रास प्रांतांत मात्र सहकारी तत्त्वावर आधारलेल्या कंझूमर्स सोसायट्या पूर्वींच निघाल्या असून त्यांचें कार्यही उत्तम तऱ्हेनें चालू होतें. महाराष्ट्रांत कंझूमर्स सोसायट्यांची कल्पना गेल्या महायुद्धांत (१९३९ ते १९४५) अन्नधान्याची परिस्थिति जपाननें युद्धप्रवेश केल्यामुळें बिघडावयास लागली त्यावेळीं निघाली व आज पुण्यास व इतरत्र ज्या कंझूमर्स सोसायट्या आपणांस दिसतात त्यांपैकीं बहुसंख्य युद्धकालांत किंवा त्यानंतर स्थापन झालेल्या आहेत. सरकारनें रेशनची पद्धत अमलांत आणावयाचें ठरविल्यावर व अन्नधान्याचा तुटवडा भासूं लागल्याबरोबर ठिकठिकाणचे नागरिक एकत्र येऊं लागले व मिळेल त्या धान्याचें वाटप सर्वांना समान तऱ्हेनें कसें उपलब्ध होईल याचा विचार करूं लागले. सर्वांनीं मिळून सहकारी पद्धतीवर जर कंझूमर्स सोसायटी काढली तर हें तत्त्व प्रत्यक्ष सत्यसृष्टींत उतरूं शकेल असें वाटूं लागलें. याप्रमाणें कंझूमर्स सोसायट्यांचा उगम समान संकटाच्या भावनेमुळें उत्पन्न झालेल्या आपलेपणांतून झालेला आहे. उत्तम तत्त्वांची प्रत्यक्ष अंमलबजावणी ही अर्थात् त्या त्या नागरिकांच्या स्वभावधर्मावर अवलंबून असते. आपले जे कांहीं राष्ट्रीय गुणदोष आहेत व सामाजिक धागेदोरे आहेत त्यांस अनुसरून आपल्या विविध चळवळींना कमीजास्त यश येतें. सहकारी संस्था या एकनिष्ठेवर आधारलेल्या असल्यानें व त्यांत एक प्रकारची मानसिक शिस्त असल्यानें, शिस्तीच्या अभावीं ज्याप्रमाणें आपल्या इतर चळवळींत कमीपणा येतो, त्याप्रमाणें ह्याहि चळवळींत आपल्या या राष्ट्रीय दोषांमुळें थोडें वैगुण्य प्राप्त होतें. कंझूमर्स सोसायट्यांचें कार्य पाहिलें असतांना आपणास ही गोष्ट ठळकपणें दिसून येते कीं, रेशनखेरीज इतर वस्तूहि आपल्या सहकारी दुकानांतच आपण घेऊं अशी एकनिष्ठा सभासदांमध्यें ज्या प्रमाणांत दिसावयास पाहिजे त्या प्रमाणांत दिसून येत नाहीं.

त्यानंतर दुसरी गोष्ट जी प्रामुख्यानें नजरेस येते, ती ही कीं, सहकारी वृत्तीवर सतत चाललेली ही चळवळ न राहातां कांहीं थोड्या व्यक्तींच्या एकनिष्ठ कार्यतत्परतेवर फार ताण पडून ती चालवावी लागते. सहकारी सभासदांची सहानुभूति व सर्वांनीं आपल्या कार्याचा वाटा उचलण्याची पद्धत या गोष्टी आपल्याकडे अभावानेंच तळपत असतात. पुष्कळ वेळां आपण निरनिराळ्या सहकारी संस्थांमधून कार्यकर्त्यांत तट पडलेले पाहातों. वास्तविक जेथें सहकारी तत्त्वावर काम करणें हें ध्येय असतें, तेथें अशी कार्यकर्त्यांमध्यें तटबंदी कां पडावी हें समजत नाहीं. परंतु येथेंही आपल्या इतर क्षेत्रांत दिसणारा सामाजिक दोषच कारणीभूत आहे यांत शंका नाहीं. सामुदायिक जीवनापेक्षां व्यक्तिगत जीवनाला आपण जास्त महत्त्व देतों व तें आपलें वैशिष्ट्य समजतों. त्यामुळें आपल्या संस्था ह्या वैयक्तिक कर्तृत्वाचे पडसाद ठरतात व त्या त्या व्यक्तीबरोबर त्या हेलकावे खात असतात. वैयक्तिक मोठेपणाला संस्थांमधून वाव मिळावयास लागला कीं त्या व्यक्तीच्या सभोंवतालच्या वर्तुळाला गट वा पक्ष असें नामाभिधान प्राप्त होतें व अशा रीतीनें कोणत्याही तत्त्वावर न आधारलेले असे पक्षोपपक्षांचे तट उत्पन्न होतात व बहुतेकांचा उत्साह वा बुद्धिमत्ता मग अशा पक्षोपपक्षांचें सामर्थ्य कमीजास्त प्रमाणांत टिकविण्यावर अगर नष्ट करण्यावर केंद्रित होतात. अर्थातच मग संस्थेच्या कार्यांतील अडचणींबरोबरच विरोधकांच्या विरोधाला तोंड देणें हेंही एक आवश्यक कर्तव्य अशा संस्थांमधून क्रमप्राप्त ठरतें.

वरील प्रकारच्या सर्वसाधारण सहकारी संस्थांमधून दिसून येणाऱ्या अडचणींबरोबरच कंझूमर्स सोसायट्यांच्या म्हणून कांहीं विशिष्ट अडचणी असतात. या सोसायट्यांचा चालकवर्ग हा बहुतांशीं इतर आपापल्या व्यवसायांत मग्न असल्यानें व या सोसायट्या चालविणें हा एक प्रकारचा छंद म्हणून अगर सार्वजनिक हितबुद्धीनें पत्करलेला असा मार्ग असल्यानें या सोसायट्यांचें प्रत्यक्ष काम बहुतांशीं त्या सोसायटीच्या नोकरवर्गावरच पडतें. आपल्याकडे अद्याप असा कार्यक्षम नोकरवर्ग तयार झाला नसल्यानें या कार्यांत विविध अडचणी उत्पन्न होतात. त्यांतच सध्यां महागाई भयंकर वाढल्यानें तरुण व कार्यक्षम असा नोकरवर्ग मिळणें फारच दुरापास्त होतें व तुमच्या मनांतील इच्छा-आकांक्षा कितीही उत्तम व उच्च असल्या तरी तुमचें कार्यकर्तृत्व शेवटीं दुकानांतील नोकराच्या कार्यक्षमतेनें व लहरीनेंच मोजलें जातें यांत शंका नाहीं. त्यांतच तुमच्या दुकानच्या शेजारीं वैयक्तिक मालकीचा दुकानदार डोळ्यांत तेल घालून स्वतःच्या हुशारीनें व देखरेखीखालीं आपलें दुकान सतत आकर्षक करण्यांत गुंतलेला असतो व त्यामुळें त्या दुकानची कर्तबगारी खुलून दिसण्यासारखी असते. यांतच वर निर्दिष्ट केलेला आमचा एकनिष्ठेच्या अभावाचा सामाजिक दोष जेव्हां सभासदांमध्यें पसरूं लागतो तेव्हां कंझूमर्स सोसायटीच्या चालकांची किती तिरपीट उडत असते त्याची कल्पनाहि करतां येणें अवघड आहे. इतर दुकानदारांप्रमाणें सोसायटीच्या चालकांना व्यापारांतील व रेशनमधील अडचणींना तोंड द्यावें लागतेंच, परंतु खाजगी दुकानदारांना जें काम पडत नाहीं तें म्हणजे कार्यकारी मंडळाच्या अगर सभासदांच्या सभा घेणें, त्यांना दुकानदारी व त्यांतील अडचणी समजावून सांगणें, सभासदांचीं रजिस्टरें ठेवणें, डिव्हिडंड वांटणें, बोनस देणें, सभासदांच्या तक्रारी आपलेपणानें दूर करणें, प्रत्येक सभासदांत हें दुकान त्याचें मालकीचें आहे अशी भावना उत्पन्न करणें, अशा एक ना दोन, हजार गोष्टी कराव्या लागतात व कामाचा संभार वाढत जातो. दुकानदारी चालविणें व शिवाय ती एक सहकारी सभासदांची संस्था म्हणून चालविणें, अशी दुहेरी जबाबदारी चालकांना संभाळावी लागते. यांतच कांहीं सभासदांच्या मर्जी—

गैरमर्जीहि मनुष्यस्वभावाला धरून संभाळाव्या लागतात, त्या निराळ्याच.

दुकानदारी चालविणें यांत कांहीं गोष्टी गृहीत धरलेल्या असतात. त्या सोडविण्याचा मार्ग सहकारी कायद्यांत नसल्यानें फार कुचंबणा होते. आपल्याकडील, निदान किराणाभुसार मालाच्या कंझूमर्स सोसायट्यांचे बाबतींत उधारीबद्दल फार त्रास होतो. दुकानदारी आली कीं उधारी आलीच. तुम्ही ती देण्याचें बंद केले तर शेजारील दुकानदार त्या गिऱ्हाइकाची वाट पहातच असतो. अशा वेळीं जर कायद्याच्या कांटेकोर शब्दांत तुमच्या दुकानचा व्यवहार तुम्ही बसवूं लागला कीं ज्या प्रमाणांत सभासदां-मध्यें सोसायटीविषयीं एकनिष्ठा बिंबली असेल त्या प्रमाणांत हा प्रश्न सहज सुलभतेनें सुटत असतो अगर अवघड होत जातो.

अशा कंझूमर्स सोसायट्यांना आणखी एक कोणती अडचण भासत असेल, तर त्यांना मोठ्या प्रमाणावर माल पुरविणाऱ्या होल-सेल सहकारी सोसायट्यांचा अभाव ही होय. या बाबतींत जेथें जेथें मालाची निपज होत असेल तेथें तेथें प्राथमिक सोसायट्यांना माल पुरविण्यासाठी होलसेल सोसायट्या स्थापन करावयास पाहिजेत व तेथें मालाची ग्रेड लावून दिली पाहिजे. अशी जर व्यवस्था करण्यांत आली तर किरकोळ विक्रीचीं कंझूमर्स सोसायटींचीं दुकानें चढा-ओढींत टिकूं शकतील.

**अमेरिकेच्या व्यापारी बोटी**—अमेरिकन मर्चंट मरीन इंस्टि-ट्यूटनें 'टँकर्स' जातीच्या बोटींची निरनिराळ्या देशांची संख्या पुढीलप्रमाणें दिली आहे:—अमेरिका ७४१ बोटी, ब्रिटन ३२२ बोटी, नॉर्वे १९६ बोटी, पनामा ८६ बोटी, स्वीडन ३७ बोटी, सोव्हिएट रशिया १९ बोटी. अमेरिकेजवळ जगांतील ह्या जातीच्या एकंदर बोटींपैकी निम्याहून थोड्या अधिक बोटी आहेत.

**ऑडिटर्सची परीक्षा**—देशांतील सध्याची अशांतता लक्षांत घेऊन ऑडिटर्स सर्टिफिकेटसची पहिली परीक्षा ता. ७ व ८ जानेवारी १९४८ रोजीं व दुसरी परीक्षा ता. ५, ६, ७ व ८ जानेवारी १९४८ रोजीं घेण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. ह्या परीक्षा डिसेंबर १९४७ मध्यें घेण्याचें प्रथम जाहीर झालें होतें. परीक्षेसाठी करावयाचे अर्ज उमेदवारांनीं ८ नोव्हेंबर पर्यंत करावयाचे आहेत.

**सिलोनमधील खोबऱ्याची निर्यात**—कानडा आणि अमेरिका ह्यांच्याकडून आलेली वाढती मागणी भागविण्यासाठी सिलोननें ब्रिटिश अन्नखात्याकडे अधिक खोबरें निर्यात करण्याची परवानगी मागितली होती. त्याप्रमाणें पुढील वर्षाच्या निर्यातीच्या परवानग्यांपैकी २,५०० टन खोबरें ह्याच वर्षी निर्यात करण्याची परवानगी देण्यांत आली आहे.

**उसाच्या लागवडीचें संशोधन**—लखनौ येथील लष्करी ग्रास फार्म इंडिअन सेंट्रल शुगर केन कमिटीनें उसाच्या लागवडीचें संशो-धन आपल्याकडे घेतलें आहे. उसाची लागवड व साखरेसंबंधीं संशोधन एकत्र करण्यासाठी असें करण्यांत आलें आहे. ह्या एकत्री करणांतून पुढें साखरेसंबंधीं एक संशोधन केंद्र उघडण्यांत यावयाचें आहे. जावांत साखरेसंबंधींच्या संशोधनाचें असेंच केंद्र आहे.

**रशिआंत तंबाखूचें मोठें पीक**—रशिआंत तंबाखूचें खूप पीक आलें आहे. गेल्या वर्षी सप्टेंबरपर्यंत जितकी तंबाखू गोळा केली गेली होती त्यापेक्षां तिपटीनें अधिक ह्यावर्षी गोळा केली गेली आहे. ही तंबाखू मध्य आशिया, कायमिआ इत्यादि भागांतून पिक-विण्यांत आली असून त्यांत अमेरिकन तंबाखूचीही जात आहे. रशिआंत बीटचें पीकही उत्तम आलें असून युक्रेनमधील कीएव्ह भागांतील साखरेचे कारखाने गेल्या वर्षीपेक्षा या वर्षी १५ दिवस आधींच सुरू झाले आहेत.

## रिझर्व्ह बँकेचें राष्ट्रीयीकरण

हिंदी मध्यवर्ती बँक ही भागीदारांची असावी, का सरकारी मालकीची असावी ह्याविषयीं बँकेच्या स्थापनेच्या पहिल्या बिलाचे वेळीं बराच वादविवाद झाला होता. बँक सरकारी असली तरच तिचेवर लोकांचा विश्वास बसेल आणि भागीदारांच्या बँकेचीं सूत्रें केवळ पैसेवाल्यांच्या हातीं जातील, असें एका पक्षाचें म्हणणें होतें. ह्या उलट, बँक भागीदारांची असेल, तरच तिच्या कारभारांत राजकीय पक्षांस हस्तक्षेप करतां येणार नाहीं, असें दुसऱ्या पक्षाचें म्हणणें होतें आणि हें प्रकरण तसेंच भिजत पडलें.

हिंदी सुधारणांबाबत श्वेतपत्रिका प्रसिद्ध झाली, त्यावेळीं ह्या प्रश्नानें पुनः उचल खाल्ली. मध्यवर्ती सरकारकडे पैशाबाबत जबाब-दारी देण्यापूर्वी राजकीय वजनापासून अलिप्त अशी मध्यवर्ती बँक स्थापन झाली पाहिजे, असें ब्रिटिश सरकारनें जाहीर केलें आणि त्यास अनुसरून सप्टेंबर, १९३३ मध्यें एक नवें बिल असेंब्लींत मांडण्यांत आलें. त्या बिलाचें १९३४ सालीं कायद्यांत रूपांतर होऊन सध्याची भागीदारांची बँक १ एप्रिल, १९३५ रोजीं अस्तित्वांत आली.

युद्धसमाप्तीनंतर बँक ऑफ इंग्लंडचें राष्ट्रीयीकरण करण्यांत आलें. त्याचा थोडा परिणाम म्हणून म्हणा किंवा तात्कालिक मध्यवर्ती हिंदी सरकारच्या स्थापनेमुळें म्हणा, रिझर्व्ह बँकेच्या राष्ट्रीयीकरणाचा प्रश्न पुनः उपस्थित झाला आणि मि. नाझिमुद्दीन-खान ह्यांनीं असेंब्लींत एक ठराव मांडून राष्ट्रीयीकरणाची मागणी केली. सरकारच्या फडणवीसांनीं त्याबाबत काळजीपूर्वक विचार करण्याचें आश्वासन दिलें आणि बँकेचें राष्ट्रीयीकरण देशाच्या हिताचें ठरलें तर तें जरूर केलें जाईल असें सांगितलें. त्यानंतर आपल्या बजेटावरील भाषणांत तर फडणवीसांनीं बँकेचें राष्ट्रीयी-करण करण्याचें सरकारनें ठरविलें असल्याचें जाहीरहि केलें. अर्थात्, हें राष्ट्रीयीकरण केव्हां व कोणत्या प्रकारें करावें, ह्याचा कालांतरानें विचार करणें इष्ट होईल असाहि खुलासा त्यांनीं केला. त्यानंतर आतापर्यंत रिझर्व्ह बँकेच्या राष्ट्रीयीकरणाबाबत जबाबदार मतप्रदर्शन झालेलें नाहीं.

---

### व्यापार-उद्योग

स्वदेशांतील व परदेशांतील व्यापारविषयक घडामोडी, त्यांची ज्यास्तींत ज्यास्त माहिती व चिकित्सा हीं मुख्यतः व्यापारांत व धंद्यांत वावरणाऱ्या वर्गापुढें व अनुषंगानें सर्व जनतेपुढें मांडावी व त्याच्या योगानें अप्रत्यक्षपणें उद्योगधंद्यांच्या वाढीला मदत व्हावी, ह्या हेतूनें हें मासिक श्री. अविनाश मोहाडीकर ह्यांच्या संपादकत्वा-खालीं मुंबई येथें सुरू झालें आहे. प्रो. द. रा. घारपुरे हे सल्लागार म्हणून मासिकास लाभले आहेत. प्रस्तुत मासिकाचें स्वागत करणारे अनेक पुढाऱ्याचे संदेश ह्या पहिल्या अंकांत प्रसिद्ध करण्यांत आले असून त्यामुळें मासिकाबाबत ज्या अपेक्षा निर्माण झाल्या आहेत त्यांची जाणीव चालकांस आहे; आणि पहिल्या अंकांतील लेखांच्या स्वरूपावरून मासिकाच्या यशसिद्धीबद्दल विश्वास वाटतो. जनतेची सेवा करण्याची प्रबळ इच्छा, उत्साह, कष्ट आणि हौस ह्यांचें भांडवल चालकांजवळ भरपूर असल्याकारणानें मासिकास जनतेचा सक्रिय पाठिंबा अधिकाधिक मिळत जाईल. व्यापार व उद्योग ह्याविषयीं महाराष्ट्रीयांस आवड वाटूं लागली आहे. तिला योग्य मार्गदर्शन करून तो फलदायी करण्याचे कामीं "व्यापार-उद्योग" महत्त्वाची कामगिरी करूं शकेल.

## हिंदुस्थानचा औद्योगिक विकास

### डॉ. ग्रैडी ह्यांचा अभिप्राय

हिंदी संघराज्यांतील अमेरिकेचे वकील डॉ. ग्रैडी, ह्यांनीं दिल्ली येथें तां. १७ ऑक्टोबर रोजीं ऑल इंडिआ मॅन्युफॅक्चरर्स ऑर्गनायझेशन ह्या संस्थेपुढें केलेल्या भाषणाचा सारांश येथें दिला आहे.–

"हिंदुस्थानच्या इतिहासांतील विकासाच्या मोठ्या कालखंडाला प्रारंभ झाला आहे, ह्यांत शंका नाहीं. ह्या विकासांत उद्योगधंद्यांची वाढ ही पायासारखी आहे. १९४२ सालीं अमेरिकन सरकारचें टेक्निकल मिशन हिंदुस्थानांत आलें होतें. मिशननें हिंदुस्थान सरकारकडे केलेल्या अहवालांत हिंदुस्थानच्या औद्योगिक प्रगतीच्या शक्यतेची कल्पना करून दिलेली आहे. त्यावेळीं आम्हीं युद्धसाहित्याच्या निर्मितीच्या दृष्टीनेंच विचार केला हें खरें असलें, तरी त्याचवेळीं हिंदुस्थानच्या औद्योगिक साधनसंपत्तीचा आणि औद्योगिक वृद्धीच्या शक्याशक्यतेचाहि विचार आम्हांस करावा लागला. आमच्या अहवालांत केलेल्या शिफारसी अंमलांत आणल्या गेल्या नाहींत ह्याबद्दल मला वाईट वाटतें. त्या शिफारसी कृतींत आल्या असत्या तर केवळ युद्धसाहित्याचेंच उत्पादन वाढलें असतें असें नाहीं; तर तुमच्या देशाला औद्योगिक दृष्टीनें चालना मिळून ती युद्धोत्तर कालांतही तुम्हांस उपयोगी पडली असती. ह्याबाबत १९४२ सालीं माझा जो ग्रह झाला तो आज अधिकच दृढमूल झाला आहे. यशस्वी औद्योगिक विकासाला जें जें लागतें तें तें सर्व तुमच्या देशांत आहे. तुमच्या जवळ कच्चा माल आहे; पुढाकार घेणारे उद्योगपती आहेत; कुशल कामगार आहेत; त्यांना धंदेवाईक शिक्षण दिलें तर ते अधिकच कसबी होतील. स्वतःच्या देशांत आणि ह्या भूभागांत मोठी बाजारपेठही तुमच्याजवळ आहे. नेटानें व धडाडीनें पुढें यावयाचें ठरविलेत तर तुम्हांला कोणीही अडवूं शकणार नाहीं.

### प्रेरक शक्तीचें महत्त्व

"उद्योगधंद्यांना लागणारी प्रेरक शक्ति उत्पन्न करणें ही सगळ्यांत महत्त्वाची व मूलभूत गोष्ट आहे, हें मी आपणांस सांगावयास पाहिजे असें नाहीं. तुमच्या देशांत जल–विद्युत् शक्तीचीं केंद्रें प्रचंड प्रमाणावर उभारतां येतील. हीं केंद्रें उभारण्यांत आलीं तर तुमच्या उद्योगधंद्यांना जरूर असणारी प्रेरक-शक्ति तर मिळेलच; पण शिवाय तुमच्या देशांतील पाटाच्या पाण्याखालच्या जमिनीचें क्षेत्र वाढल्यानें शेतीलाही स्थैर्य प्राप्त होईल. मोठ्या प्रमाणावर धरणं आणि पाटबंधारे तयार झाले म्हणजे पावसाच्या अनिश्चिततेपासून तुम्ही निर्भय व्हाल. अशा शेतीशीं संबंधित अशा पुष्कळ उद्योगधंद्यांची नव्यानें वाढ होईल. कच्च्या मालावर संस्करण करणाऱ्या धंद्यांमुळें रोजगारी वाढते आणि बाजारपेठेचें क्षेत्रही विस्तार पावतें, आणि त्यामुळें अधिक उत्पादनाला पुन्हा जास्त वाव मिळतो. औद्योगिक विकासाबरोबर तुमच्या वहातुकीच्या साधनांचीही वाढ होईल. रेल्वे आणि हमरस्ते ह्यांवरील वहातुक वाढेल व रेल्वेरस्त्यांची व हमरस्त्यांची वाढ होईल. नद्या व कालवे ह्यांवरील वहातुक वाढेल, किनाऱ्यावरील वहातूकही वाढेल. उद्योगधंद्यांत यांत्रिक संशोधनाला भरती येईल. त्याचप्रमाणें बाजार पेठ कशी जिंकावी अगर वाढवावी ह्याबद्दल तुम्हाला विचार करावा लागेल. शेतीच्या व औद्योगिक मालाच्या गुणांच्या दृष्टीनें दर्जा ठरविण्यासाठीही तुम्हाला संशोधन करावें लागेल. तुमचीं विद्यापीठें आणि कॉलेजें ह्यांतून, भावी औद्योगिक आणि धंदेवाईक पुढाऱ्यांच्या शिक्षणाची अधिक चांगली सोय करावी लागेल. आजच तुमच्या देशांत पोलाद, सीमेंट व कांहीं जड रासायनिक द्रव्यें ह्यांचे मूलभूत कारखाने आहेत. ह्या धंद्यांचा अधिक विस्तार होणें जरूर आहे अणि तसा तो होईलही. कच्चा माल व प्रेरक शक्ति असल्यावर काय करतां येईल हें लक्षांत येण्यासाठी तुम्ही इटलीचा विचार करा. इटलीजवळ कच्चा माल जवळजवळ मुळीच नसतांना सुद्धां, युद्धापूर्वी इटली एक महत्त्वाचा उद्योग–प्रधान देश झाला होता. मग तुमच्या जवळ तर दोन्ही भरपूर आहेत.

### आर्थिक प्रगतीचा वेग

"आर्थिक प्रगती ही अग्नीच्या भुकेसारखी आहे; अग्नि जसा तो जितकें जाळील तितकी त्याची भूक वाढत जाते, त्याचप्रमाणें आर्थिक प्रगतीच्या वेगाची स्थिति आहे. आर्थिक प्रगतीला एकदा वेग आला कीं, प्रगति अत्यंत आश्चर्यकारक रीतीनें होते. मी हिंदुस्थानांत १९४२ सालीं आलों त्यावेळीं, येथील लोकांच्या बुद्धिमत्तेचा मला चांगला प्रत्यय आला. जिकडे पहावें तिकडे बुद्धिमान माणसें मला दिसून येतात. पण, आज तुमच्यापुढें फक्त राजकीय संघटनेचाच प्रश्न नसून शेती, उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांच्याही संघटनेचा प्रश्न आहे. तुमच्या भवितव्यतेचीं सूत्रें तुमच्या हातीं नव्हतीं, तोंपर्यंत तुमच्या देशांतील निरनिराळ्या गटांचे वरील संघटनेच्या बाबतींत सहकार्य घडून येणें कठीण होतें. पण, आतां हें सहकार्य आपण लवकर घडवून आणाल अशी मला खात्री आहे. राष्ट्रीय संपत्तींत वाढ झाली म्हणजे तुमच्या देशांतील कर–पद्धतीचा पाया अधिक खोल आणि विस्तृत होईल हें नेहमींच सांगण्यांत येत आहे. तुमच्या बँकांचे व चलनविषयक व्यवहार अधिक दृढतर होतील. तुमच्या देशाची चलनविषयक व्यवस्था निरोगी आहे हें तुमच्या अर्थमंत्र्याचें मत मलाही पटतें. पण, हा निरोगीपणा टिकविण्यासाठी राष्ट्रीय संपत्तीची वाढ आणि सुसूत्र अर्थव्यवहाराचें धोरण ह्यांची आवश्यकता आहे. मानवी व्यवहारांत कायमचें स्थिर असें कांहींच नसतें. तुम्हांला पुढें तरी पाऊल टाकलें पाहिजे, नाहींतर मागें तरी जावें लागेल. तुमच्या पुढें संधि तर फार नामी आली आहे. तुम्ही आपली राजकीय संघटना स्थिरस्थावर करतांनाच जर पुढील योजना तपशिलवार आखली तर बरें होईल. ही योजना लवकर अंमलात आणतां येईल आणि त्यामुळें तुमच्या देशाच्या आर्थिक जीवनाची नाडी अधिक जोरानें पण धिमेपणानें चालेल."

---

**सर श्रीराम ह्यांची नेमणूक**— हिंदुस्थान सरकारच्या अन्न-खात्याला सल्लामसलत देण्यासाठीं सर श्रीराम ह्यांची नेमणूक करण्यांत आली आहे. परदेशांत विकत घ्यावयाचें अन्नधान्य, त्यासाठीं द्यावयाच्या किंमती, इत्यादी बाबींसंबंधीं त्यांनीं अन्न-खात्याला सल्ला द्यावयाचा आहे.

**जगांतील कापसाच्या पिकाचा अंदाज**— अमेरिकेच्या शेतकी खात्यानें १९४७–४८ मधील कापसाच्या पिकाचा अंदाज २ कोटी, ६१ लाख गांसड्या गेला आहे. मागील सालीं २ कोटी, १५ लाख गासड्या कापूस पिकला होता. जगाच्या उत्तर गोलार्धांत रशिआ व अमेरिका ह्यांतील उत्पादन वाढलें असून दक्षिण गोलार्धांत अर्जेंटिना, ब्राझिल व पेरू ह्या देशांतील उत्पादन वाढलें आहे.

**गिऱ्हाईक तुटल्याचा परिणाम**— ब्रिटननें अमेरिकेंतील तंबाखू आयात करण्यावर कडक निर्बंध घातल्यानें, अमेरिकेंतील तंबाखूच्या किंमतीवर बराच परिणाम होईल असा अमेरिकन शेतकी खात्याचा अंदाज आहे. किंमती फार घसरूं न देण्यासाठी अमेरिकन सरकारला अधिक तंबाखू विकत घ्यावी लागेल, असें म्हणतात.







दि रत्नाकर बँक लिमिटेड. स्थापना १९४२

शाखा:–१ कोल्हापूर, २ शाहुपुरी, ३ सांगली,
४ मिरज, ५ जयसिंगपूर.

| | रु. |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | १०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ६,२७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | १०,००० |
| खेळतें भांडवल अंदाजें | ३८,००,००० |

—: अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात. :—

नामदार बी. बी. पाटील, B. A. LL. B. डेव्हलपमेंट मिनिस्टर, सांगली स्टेट. चेअरमन

एल. एन. शहा, B Com., C.A.I.I.B. मॅनेजर


दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

पुणें शाखा:–९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारींचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. –एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.–

ब्रँच सेक्रेटरी

पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८

कृष्णा शुगर मिल्स लि.

कृष्णा–किनूर

कारखाना सुरू झाली.

धंद्याच्या वाढीसाठी ठेवी स्वीकारल्या जातात.

६% क्यु. प्रेफरन्स शेअर्स विक्रीस आहेत.

विशेष माहितीसाठी लिहा.

पोस्ट:–कृष्णा–किनूर, जिल्हा:–बेळगांव.

विंचूरकर अँण्ड को. मॅनेजिंग एजण्टस्

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,०४२ |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,०८,१९५ |
| खेळतें भांडवल | रु. ६५,००,००० |

मुंबई शाखा:–इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

" बँक शिड्यूल्ड बँक झाली आहे. "

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर

श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर

## शनिवार वाड्याच्या शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यासाठी उपयोग

पुणें शहरांतील सुप्रसिद्ध ऐतिहासिक शनिवार वाडा हा सध्या हिंदुस्थान सरकारच्या पुराणवस्तु संशोधन खात्याच्या ताब्यांत आहे. शहरांतील मध्यवर्ती ठिकाणीं, तटबंदीनें सुरक्षित अशा ह्या जागेचा शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याकडे चांगल्या तऱ्हेनें उपयोग होण्याजोगा आहे. ह्या दृष्टीनें, शनिवार वाडा हिंदुस्थान सरकारकडून प्रांतिक सरकाराचे ताब्यांत देण्यांत यावा, असा प्रयत्न मुंबई सरकारनें केला व तो यशस्वीहि झाला आहे असें समजतें. ह्या पुढील पायरी म्हणजे ह्या स्थळाचें ऐतिहासिक स्वरूप कायम राखून त्यांत लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, महाराष्ट्र प्रादेशिक संग्रहालय, ऐतिहासिक संग्रहालय, वगैरे सारख्या संस्थांच्या उपयुक्ततेचा अधिकाधिक फायदा जनतेस होईल. ह्या दृष्टीनें त्यांच्या इमारतींची व्यवस्था करणें, हा होय. ह्या संबंधांत सरकारास सल्ला देण्याकरितां मुंबई सरकारनें एक तज्ज्ञांची समिति नेमली आहे. वरील संस्थांची शनिवार वाड्यांत सोय केल्यानें त्यांच्या वाढीस पुरेसा वाव मिळणार आहे आणि त्या दृष्टीनें इमारतींची आंखणी आगाऊच करून ठेवतां येईल. मुंबई सरकारनें स्वीकारलेल्या प्रगतिपर धोरणाबद्दल त्याचें अभिनंदन करणें आवश्यक आहे. त्यांच्या योजनेस महाराष्ट्राचा पाठिंबा आहे, हें नमूद करण्याची आवश्यकता नाहीं.

---

### उद्यम एंजिनियरिंग लि. च्या नव्या जागेंत वृक्षारोपण

शुक्रवार ता. २४ ऑक्टोबर रोजीं, विजयादशमीचे दिवशीं, पुणें येथील भिकारदास मारुती समोरील उद्यम एंजिनियरिंग लिमिटेड या कंपनीच्या एरंडवणें येथील नवीन जागेंत 'वृक्षारोपण समारंभ' श्री. बाबुराव सणस, नगराध्यक्ष पुणें, यांचे हस्तें थाटानें पार पडला. दुपारी चार वाजतां श्री. बाबुराव हे कंपनीचे नवीन जागीं आल्यावर कंपनीचे चालक श्री. ना. अ. मेहेंदळे व संस्थापक श्री. द. वि. गोडसे यांनीं त्यांचें स्वागत केलें व त्यांना नवीन जागा व चालू असलेल्या इमारती दाखविल्या. त्यानंतर श्री. बाबुराव यांचे हस्तें एक आम्रवृक्षाचें रोप व एक सोनचाफ्याचें रोप अशीं दोन रोपें वैदिक विधीनें मंत्र वगैरे म्हणून लावलीं गेलीं. त्यानंतर जमलेल्या मंडळींची एका शेड मध्यें लहानशी सभा झाली. कारखान्याचे संस्थापक श्री. द. वि. गोडसे यांनीं कारखान्याची प्रगति अगदी अल्प प्रमाणापासून आजपर्यंतच्या स्वरूपापर्यंत कशी होत आली आहे, तें सर्व मंडळींना निवेदन केलें व समारंभाचे पाहुणे श्री. बाबुराव सणस यांना पुष्पहार घालून चार शब्द बोलण्यास विनंती केली. श्री. बाबुराव सणस यांनीं आपणास उद्योगधंद्याबद्दल पहिल्यापासून कसा आपलेपणा वाटतो तें सांगून स्वतः अशा उद्योगधंद्यांना मदत करण्यास केव्हांही तयार असल्याचें जाहीर केलें. अशा प्रकारचे उद्योग सर्वत्र निघाल्याशिवाय आपल्या भारताचा उद्धार होणार नाहीं. तेव्हां सर्वांनीं अशा कार्याला अवश्य मदत करावी, असें सांगितलें. त्यानंतर जमलेल्या पाहुणे मंडळी पैकी श्री. चिं. गो. काळे निवृत्त चीफ इंजीनियर, यांनीं उद्योगधंद्यांचें महत्त्व सांगून कंपनीचे वतीनें श्री. बाबुराव सणस यांचे आभार मानले. त्यानंतर पानसुपारी वाटल्यावर कारखान्यांतील कांहीं प्रमुख कामगारांच्या ओळखी पाहुण्यांना करून देण्यांत आल्या.

---

दी

# बँक ऑफ कोल्हापूर, लि.

*( कोल्हापूर येथें सन १९२९ सालीं स्थापन झालेली व भागीदारांची मर्यादित जबाबदारी असलेली. )*

एच. एच. दी छत्रपति महाराजासाहेब ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ४०,०६,५०० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. | २०,१६,००० |
| भरलेलें (३०-६-४७) | रु. | ३,०५,४७० |
| रिझर्व्ह (३०-६-४७) | रु. | ५,८६,६६० |

एकूण खेळतें भांडवल रु. १,००,००,००० हून अधिक

मुख्य कचेरी--बँक ऑफ कोल्हापूर बिल्डिंग, लक्ष्मीपुरी-कोल्हापूर.

शाखा : संस्थानांतील:—(१) शाहुपुरी-कोल्हापूर, (२) गुजरी-कोल्हापूर, (३) जयसिंगपूर, (४) इचलकरंजी, (५) पेठ-वडगांव, (६) मलकापूर, (७) गडहिंग्लज. संस्थानाबाहेरील:—(८) मुंबई, (९) निपाणी (जि. बेळगांव)

★ चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

★ योग्य तारणावर कर्जें, ओव्हरड्रॉफ्टस व कॅश क्रेडिटस दिलीं जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

★ मौल्यवान चजिवस्तु सुरक्षित ठेवणेसाठी हेड ऑफिसमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची उत्तम व्यवस्था.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

व्ही. प. सावंत, अॅ. मॅनेजर

---

# पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | " Cencobank " | नं. ११ |

मुख्य कचेरी:-लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर







गेल्या वर्षांतील स्पृहणीय यश—
हाच नव्या वर्षाचे कार्याला सुमुहूर्त—


**दि सुप्रीम म्यूच्युअल**
**विमा कंपनी लि. पुणें २.**

| | | रुपये |
|---|---|---|
| आलेलें काम | : : | २७,२१,२५० |
| स्वीकृत काम | : : | २५,४४,७५० |
| पूर्ण काम | : : | २२,६३,००० |

अल्पावधींत मिळविलेल्या यशाची वरील आंकडेच ग्वाही देतील.

—एजन्सीसाठीं व विम्यासाठीं चौकशी करा—

व. न. म्हैसूर,
मॅनेजर



अधिक धान्य पिकविण्याची योजना
—यशस्वी होण्यास—
**किर्लोस्कर पंपिंग सेट्स**
हें अमोघ साधन आहे.
त्याचें सहाय घ्या !
किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—
**खादी मन्दिर**
२६२, बुधवार पेठ,
दमडेरे बोळाजवळ,
पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

**आरको**
प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तू
आरको निलगिरी तेल
लक्ष्मी एजन्सी, मुंबई २४


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.